# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

-----------------------------------------------------------------------------------------

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून कार्तिकी एकादशी व संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त करण्यात आलेल्या जादा बस नियोजनास भाविकांचा चांगला प्रतिसाद

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून कार्तिकी एकादशी व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी दरवर्षी जादा बसेसचे नियोजन केले जाते. सन २०२२ मध्ये दि. ३ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०२२ दरम्यान जादा बसेसचे नियोजन करण्यात आले होते.

**सन २०२२ मध्ये करण्यात आलेल्या जादा बस नियोजनाची, उत्पन्नाची व प्रवाशी संख्येची आकडेवारी खालीलप्रमाणे**

| तपशील | मार्गावरील एकूण बस संख्या | तिकीट विक्रीतून मिळालेले उत्पन्न | तिकीट व पास विक्रीतून मिळालेले एकूण उत्पन्न | ई.पी.के. | प्रति बस/प्रति दिन उत्पन्न | प्रति दिन एकूण प्रवाशी संख्या | प्रति बस/प्रति दिन प्रवाशी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ९,६७३ | ८,७५,३४,३०२ | ९,७४,९५,६०७ | ३७.९७ | ६०,४१९ | ६७,५४,१५९ | ४,१८७ |
| प्रतिदिन | १,६१२ | १,४५,८९,०५० | १,६२,४९,२६८ | | १०,०७० | ११,२५,६९३ | ६९८ |

परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. श्री. संजय कोलते यांचे मार्गदर्शनाखाली यावर्षी देखील दि. ६ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२३ दरम्यान जादा बसेसचे नियोजन करण्यात आले होते.

**सन २०२३ मध्ये करण्यात आलेल्या जादा बस नियोजनाची, उत्पन्नाची व प्रवाशी संख्येची आकडेवारी खालीलप्रमाणे**

| तपशील | मार्गावरील एकूण बस संख्या | तिकीट विक्रीतून मिळालेले उत्पन्न | तिकीट व पास विक्रीतून मिळालेले एकूण उत्पन्न | ई.पी.के. | प्रति बस/प्रति दिन उत्पन्न | प्रति दिन एकूण प्रवाशी संख्या | प्रति बस/प्रति दिन प्रवाशी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | १०,६२१ | ९,९२,९९,८९० | १०,५५,२७,५०५ | ४२.०४ | ५९,५९० | ७६,६२,३३१ | ४,३२७ |
| प्रतिदिन | १,७७० | १,६५,४९,९८२ | १,७५,८७,९१८ | | ९,९३१.६७ | १२,७७,०५५ | ७२१ |

कार्तिकी एकादशी व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त पीएमपीएमएल कडून दरवर्षी करण्यात येणाऱ्या जादा बस नियोजनास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळतो. भाविकांनी पीएमपीएमएल च्या पर्यावरणपूरक बससेवेला दरवर्षी असाच प्रतिसाद द्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

-----------------------------------------------------------------------------------------

दि. १२/१२/२०२३

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-

कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---